## अवकाळी पावसाचा भाजीपाला व फळ पिकांना अडथळा

महाराष्ट्र राज्यात काही जिल्ह्यांत अवकाळी पावसामुळे भाजीपाला व फळ पिकांचे नुकसान झाले आहे. त्याचप्रमाणे राज्यातील शेतकऱ्यांना भाजावळ करण्यात मोठा अडथळा निर्माण झाला आहे. एकीकडे अवकाळी पावसामुळे हातातोंडाला आलेल्या पिकांचे नुकसान तर झाले, त्याचबरोबर जमिनीमध्ये पीक उत्तम प्रकारे यावे यासाठी जमिनीची भाजावळ केली जाते. तीच कोपऱ्यात करण्यात आलेली भाजावळ भिजल्याने शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागत आहे. म्हणजे एक प्रकारे शेतकऱ्यांवर नैसर्गिक संकट आले असे म्हणता येईल. एक वेळ दुबार पेरणी करणे सोपे असले तरी दुबार भाजावळ करणे कठीण असते. अशा नैसर्गिक संकटाच्या वेळी शासनाने शेतकऱ्यांच्या मागे खंबीरपणे उभे राहणे गरजेचे आहे. त्यामुळे भाजावळ पावसाच्या पाण्याने ओली झाली असेल, तर व्यवस्थित सुकवून पुन्हा भाजावळ करावी लागते. जर त्यानंतर ढगाळ वातावरण असेल तर भिजलेला पालापाचोळा कुजला जातो. त्यामुळे दुर्गंधी वाढून वातावरण दूषित होते. असे वातावरण आरोग्याला अपायकारक ठरू शकते.

भाजावळ झाल्यानंतर भाजावळीची एकत्र केलेली राख वाहून गेली असेल, तर झाडाखालील पातेऱ्याची भाजावळ केली जाते. कारण जमिनीची मशागत करण्यापूर्वी भाजावळ केल्यास जमिनीची सुपीकता टिकून राहते. अशा वेळी राज्यातील कृषी तज्ज्ञांनी पुढे येणे आवश्यक आहे. पावसाळा सुरू झाल्यावर शेतीच्या बांधावर जाण्यापेक्षा सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांना अशा संकटातून सावरले पाहिजे. म्हणजे शेतकरी शेतीची मशागत करताना अधिक जोमाने काम करतील. पिकाची पेरणी करणाऱ्या जमिनीची भाजावळ केल्याने जमिनीतील मागील पिकांचे मूळ नष्ट होते. जमीन भाजली जाते, त्यामुळे नांगरणी करताना जमीन भुसभुशीत होते. याचा परिणाम पावसाचे पाणी साठून राहून जमिनीत ओलावा निर्माण होतो. तसेच पेरलेले बियाणे सुद्धा लवकर रुजून यायला मदत होते.

भाजावळ हा शब्द नवीन पिढीला परिचित वाटत नसला तरी शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा शब्द आहे. शेतीचे पीक उत्तम प्रकारे व्हायचे असेल, तर शेतकऱ्यांना शेत जमिनीची भाजावळ करावी लागते. त्यासाठी एप्रिल व मे महिना शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्त्वाचा असतो. आता जरी आधुनिक पद्धतीने शेती करत असलो तर खेडोपाड्यात आजही पारंपरिक पद्धतीने शेती केली जाते. त्यामुळे ज्या कोपऱ्यात भात पेरायचे असेल त्या कोपऱ्यामध्ये भाजावळ केली जाते. त्यासाठी डिसेंबर महिन्यामध्ये कवळा तोडली जातात. कवळा म्हणजे झाडाच्या फांद्या तोडणे व तोडलेल्या फांद्या दिंड्याने एकत्र करून बांधणे म्हणजे 'कवळा' होय. कोकणामध्ये 'कवळा' हा परिचित शब्द आहे. महिन्यानंतर म्हणजे, ओली असणारी कवळा वाळल्यानंतर कोपऱ्याच्या एका बाजूला उभी करून ठेवली जातात.

सध्या शेतकऱ्यांचा भाजावळीचा मोसम सुरू आहे. मात्र त्याला अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने वाळलेली कवळा भिजल्यामुळे पुन्हा एकदा शेतकरी राजा संकटात सापडला आहे. शेतीसाठी भाजावळ अतिशय महत्त्वाची असते. कोणत्याही पिकाचे शेतीतून उत्पादन घेण्यापूर्वी त्या जमिनीमध्ये भाजावळ करावी लागते. याचा परिणाम शेतीचे उत्पादन वाढण्याला मदत होत असते. त्याचप्रमाणे किडेमुंग्या नष्ट होतात. याचा परिणाम पिकाची चांगल्या प्रकारे वाढ होते. वाढ झाल्याने उत्पादन सुद्धा वाढण्याला मदत होऊन शेतकऱ्यांना अधिक चार पैसे मिळण्याला मदत होते. याचा चांगला परिणाम शेतकऱ्यांची क्रयशक्ती वाढण्याला मदत होते.

ज्या जमिनीमध्ये बियाणे पेरले जाते त्या कोपऱ्याची भाजावळ केली जाते. त्या कोपऱ्यात कवळा फोडून पूर्ण कोपऱ्यात पसरवली जातात. गायरीतील वाळलेले शेण बारीक करून त्यावर पेरले जाते किंवा लेंडी वरती पेरली जाते. त्याचप्रमाणे घराच्या बाजूचा किंवा बागेतील झाडाखाली असलेला पातेरा एकत्र करून तो झापातून घेऊन येऊन वरती टाकला जातो. अशा कामांना सर्रास चारकमान्यांच्या मुलांना मदतीला घेतले जाते. तशी मुले सुद्धा आनंदाने काम करतात. तेवढीच मदतीस मदत. अधिक उत्साहाने चाकरमान्यांची मुले गावची कामे करीत असतात. कोपऱ्यात कवळा फोडून लावणे, त्यावर आसपासचा पातेरा आणि त्यानंतर गायरीतील वाळलेले शेण, माळावरची गोवरी व लेंडी पेरली जाते. तीन ते चार दिवस चांगली सुकविली जाते. त्यानंतर संध्याकाळच्या वेळेला हवा कमी असेल अशा वेळी आसपासची मोकळी जागा साफ केली जाते.

वणवा जावू नये म्हणून त्याची काळजी घेतली जाते. त्यानंतर हवेचा अंदाज घेऊन आग लावली जाते. दुसऱ्या दिवशी सकाळीच येऊन झालेली राख एकत्र केली जाते. जेव्हा मशागतीला सुरुवात करणार त्या दिवशी ती राख कोपऱ्यात पेरली जाते. त्या आधी त्या कोपऱ्यातील न जळालेल्या काट्या व दगड बाजूला काढल्या जातात. म्हणजे साफसफाई केली जाते. जाड काड्या असतील, तर घरी नेल्या जातात, तर दगड कोपऱ्याच्या मेरेला लावले जातात. ही कामे चाकरमान्यांची मुले सुद्धा करताना. बऱ्याच वेळा हात काळे होतात मात्र अशी कामे करणे कष्टाची असतात, असे चाकरमान्यांची मुले म्हणतात. तसेच ही कामे करताना त्यांचा आनंद काही वेगळाच असतो, असे पाहायला मिळते. तेव्हा अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांना जमिनीची भाजावळ करताना जे नुकसान झाले आहे त्यासाठी सुद्धा आर्थिक मदत शासनाने देणे गरजेचे आहे. कारण जमिनीची उत्तम प्रकारे भाजावळ केल्यास शेतीचे उत्पादन वाढण्यास मदत होते. तेव्हा शेती उत्पादनात वाढ झाल्यास शासनाच्या महसुलात वाढ होते, हे विसरता कामा नये.

# राहुल गांधी आणि रायबरेली...

**उत्तर प्रदेशातील रायबरेली लोकसभा मतदारसंघ हा गांधी परिवाराचा गड मानला जातो. सन २०१९च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने उत्तर प्रदेशातील ८० मतदारसंघांपैकीजिंकलेली ही एकमेव जागा होती. या निवडणुकीत सोनिया गांधी या भाजपा उमेदवाराचा १ लाख ६७ हजार मतांनी पराभव करून विजयी झाल्या होत्या. मोदी लाटेतही २०१४ व २०१९ मध्ये सोनिया गांधी या रायबरेलीतून लोकसभेवर घवघवीत मते घेऊन विजयी झाल्या होत्या. आता वयापरत्वे आणि प्रकृती अस्वस्थ्यामुळे त्यांनी लोकसभा निवडणूक न लढविण्याचा निर्णय घेतला व राजस्थानमधून काही महिन्यांपूर्वीच त्या राज्यसभेवर खासदार म्हणून निवडून गेल्या. तब्बल चार वेळा रायबरेलीच्या मतदारांनी सोनियांना लोकसभेवर निवडून पाठवले. आता राहुल गांधी यांनी आपल्या आईच्या मतदारसंघातून आपले नशीब आजमावण्याचे ठरवले आहे.**

**राहुल** गांधी यांनी २०१९ मध्ये उत्तर प्रदेशातील अमेठी व केरळमधील वायनाड या दोन मतदारसंघांतून निवडणूक लढवली होती. भाजपाच्या उमेदवार स्मृती इराणी यांनी अमेठीत राहुल गांधींचा पराभव करून इतिहास घडवला. सुदैवाने राहुल हे वायनाडमधून निवडून आल्याने लोकसभेवर खासदार म्हणून आले. खरं तर, यंदाच्या निवडणुकीतही त्यांनी वायनाडमधून निवडणूक लढवली. त्यांचा उमेदवारी अर्ज दाखल करताना हजारोंच्या संख्येने शक्तिप्रदर्शन काँग्रेसने केले. केरळमध्ये मतदानही झाले. आता त्यांनी रायबरेलीतून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

सोनिया गांधी या राज्यसभेवर निवडून गेल्यामुळे रायबरेलीतून कोण निवडणूक लढवणार याची काँग्रेससह सर्वच राजकीय पक्षांना उत्सुकता होती. अमेठीत पाच वर्षांपूर्वी राहुल यांचा पराभव झाल्यामुळे ते पुन्हा स्मृती इराणींच्या विरोधात निवडणूक लढविण्याचे धाडस करणार नाहीत हे सर्वांनीच गृहीत धरले होते. अमेठी व रायबरेली हे गांधी परिवाराशी थेट संबंध जोडणारे मतदारसंघ आहेत. म्हणूनच या दोन मतदारसंघांत काँग्रेसचे उमेदवार कोण असतील याचे अनेक अंदाज व्यक्त केले गेले. मात्र उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी राहुल यांना रायबरेलीतून व गांधी परिवाराशी निकटचे संबंध असणारे व निवडणूक व्यवस्थापन पाहणारे के. एल. शर्मा यांना काँग्रेसने अमेठीतून उमेदवारी दिली आहे.

राहुल यांनी रायबरेलीतून उमेदवारी अर्ज दाखल करताच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी डरो मत... अशा शब्दांत प्रतिक्रिया व्यक्त केली. रायबरेलीतून भाजपाने दिनेश प्रताप सिंग यांना उमेदवारी दिली आहे. राहुल यांची आता अमेठीतून निवडणूक लढविण्याची हिम्मत नाही, त्यांनी अमेठीतून पळ काढला आहे, अशी प्रतिक्रिया स्मृती इराणी यांनी दिली आहे. त्या मोदींच्या सरकारमध्ये केंद्रीयमंत्री आहेत. शिवाय त्यांनी अमेठीत स्वत:चे घर बांधले असून तेथे त्या राहतात. आपण निवडून आल्यावर मतदारसंघात राहू असे त्यांनी गेल्या निवडणुकीत अमेठीच्या मतदारांना आश्वासन दिले होते. दुसरीकडे सोनिया गांधी असोत किंवा राहुल ते निवडून आल्यावर दिल्लीत राहतात. देशभर फिरतात किंवा विदेशात जातात पण मतदारसंघाकडे पाच वर्षे फिरकत नाहीत हा अनुभव अमेठी किंवा रायबरेलीतील मतदारांना आहे. आपला खासदार आपल्या मतदारसंघात राहणारा हवा, आपल्याला उपलब्ध हवा, अशी मतदारांची इच्छा असते. पण गांधी परिवाराला सल्ला देणार तरी कोण?

देशाला स्वातंत्र्य मिळल्यानंतर १९५२मध्ये लोकसभा निवडणूक झाली तेव्हा रायबरेली-प्रतापगड असा मतदारसंघ होता. तेव्हा सर्वसाधारण वर्गातून व अनुसूचित जातीतून असे दोन खासदार निवडले गेले. पंडित जवाहरलाल नेहरू यांचे जावई फिरोज गांधी हे सर्वसाधारण वर्गातून, तर बैजनाथ कुरिल हे राखीव मतदारसंघातून खासदार म्हणून निवडून आले. फिरोज गांधी यांना पं. नेहरूंनी पक्षाची उमेदवारी दिली व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रफी अहमद किडवाई यांनी फिरोज यांना निवडणूक लढविण्याचा आग्रह केला. आपल्या पतीचा इंदिरा गांधींनीही प्रचार केला होता.

१९५७ मध्ये या मतदारसंघाचे नाव रायबरेली असे झाले. या निवडणुकीत फिरोज गांधी १ लाख ६२ हजार मतांनी विजयी झाले. पण त्यांचे १९६० मध्ये निधन झाले, म्हणून या मतदारसंघात पोटनिवडणूक घ्यावी लागली. पोटनिवडणुकीत काँग्रेसचे आर. पी. सिंग निवडून आले.

१९६२ मध्ये रायबरेली मतदारसंघ दोन उमेदवारांचा होता ते रद्द झाले व अनुसूचित जातीसाठी राखीव झाला. तेव्हा काँग्रेसचे बैजनाथ कुरिल हे निवडून आले. त्यानंतर रायबरेलीत इंदिरा पर्व सुरू झाले.

१९६७ मध्ये रायबरेली मतदारसंघ आरक्षणमुक्त झाला, तेव्हा इंदिरा गांधी या राज्यसभा सदस्य होत्या. त्यांनी प्रथमच या मतदारसंघातून लोकसभेची निवडणूक लढवली. या निवडणुकीत ५५ टक्के मते त्यांना मिळाली. तब्बल १ लाख ४३ हजार मतांनी त्या विजयी झाल्या.

१९६९ मध्ये काँग्रेसमध्ये फूट पडली. १९७१ च्या निवडणुकीत त्यांनी संयुक्त समाजवादी पक्षाचे उमेदवार राजनारायण यांचा दोन लाख मतांनी पराभव केला. निकालानंतर राजनारायण यांनी निवडणुकीत घोटाळा झाल्याचा आरोप करून त्यांच्याविरोधात अलाहाबाद उच्च न्यायालयात आव्हान दिले. १२ जून १९७५ रोजी उच्च न्यायालयाने इंदिरा गांधींनी राज्य निवडणूक यंत्रणा वापरल्याचा ठपका ठेवला. त्यांची निवड अवैध ठरवली आणि त्यांना सहा वर्षे निवडणूक लढविण्यास बंदी घातली. इंदिराजी तेव्हा देशाच्या पंतप्रधान होत्या, त्यांनी दि. २५ जून १९७५ रोजी देशात आणीबाणी लागू केली. नंतर संसदेचे अधिवेशन बोलावून अलाहाबाद न्यायालयाचा निकाल रद्द ठरवला. डिसेंबर १९७५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने संसदेने निवडणूक कायद्यात केलेले बदल कायम ठेवल्याने इंदिरा गांधींचे पंतप्रधानपद कायम राहिले. आणीबाणीनंतर इंदिरा गांधींची लोकप्रियता कमालीची कमी झाली. १९७७ मध्ये झालेल्या निवडणुकीत भारतीय लोकदलाचे उमेदवार म्हणून लढलेल्या राजनारायण यांनी त्यांचा रायबरेली मतदारसंघात ५५ हजार २०२ मतांनी पराभव केला. त्यांच्या कारकिर्दीतील हा एकमेव पराभव होता. रायबरेलीतून बिगर काँग्रेसचा खासदार म्हणून निवडून येणारे राजनारायण हे पहिले होते. १९८० मध्ये केंद्रात मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखालील जनता पक्षाचे सरकार कोसळले. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत इंदिरा गांधींनी रायबरेली व मेडक (आता तेलंगणा) अशा दोन मतदारसंघांतून निवडणूक लढवली व त्या दोन्ही मतदारसंघांतून लोकसभेवर निवडून आल्या. त्यांनी मेडकची जागा कायम ठेवली व रायबरेलीतून खासदारकीचा राजीनामा दिला.

रायबरेलीत झालेल्या पोटनिवडणुकीत काँग्रेसचे अरुण नेहरू निवडून आले. १९८९ व १९९१ च्या निवडणुकीत काँग्रेसच्या शीला कौल रायबरेलीतून निवडून आल्या. शीला कौल या कमला नेहरूंचे बंधू कैलाश नाथ कौल यांच्या पत्नी. त्या काँग्रेस सरकारमध्ये मंत्री होत्या. हिमाचल प्रदेशच्या काही काळ राज्यपालही होत्या.

१९९६ मध्ये भाजपाचे अशोक सिंह १ लाख ६० हजार मतांनी विजयी झाले. त्यांनी काँग्रेसचे विक्रम कौल यांचा पराभव केला. विक्रम हे शीला कौल यांचे पुत्र. त्यांना जनता दल व बसपा यांच्यानंतर चौथ्या क्रमांकाची मते मिळाली. १९९८ मध्ये पुन्हा भाजपाचे अशोक सिंह २ लाख ४० हजार मतांनी विजयी झाले, त्यांनी काँग्रेसच्या दीपा कौल यांचा पराभव केला. दीपा या शीला कौल यांच्या कन्या. दीपा यांनाही चौथ्या क्रमांकाची मते मिळाली.

२००४ पासून सोनिया गांधी सलग निवडून येत आहेत. २००४ मध्ये त्यांनी सपा उमेदवाराचा १ लाख ५० हजार मतांनी पराभव केला. नंतर यूपीएचे सरकार केंद्रात आले. यूपीएच्या चेअरमन, राष्ट्रीय सल्लागार परिषदेच्या अध्यक्ष अशा पदांवर काम करताना लाभाचे पद मिळवले म्हणून त्यांना खासदारकीचा राजीनामा देणे भाग पडले. २००६ मध्ये त्यांनी राजीनामा दिला व लगेच झालेल्या पोटनिवडणुकीत भाजपाचे विनय कटियार यांचा त्यांनी ४ लाख १७ हजार मतांनी पराभव करून त्या लोकसभेवर पुन्हा खासदार म्हणून निवडून आल्या. २००९ मध्ये सोनिया गांधींनी बसपाचे आर. एस. कुशावह यांचा ३ लाख ७० हजार मतांनी, तर २०१४ मध्ये भाजपाचे अजय आगरवाल यांचा ३ लाख ५० हजार मतांनी पराभव केला. २०१९ मध्ये मोदी लाटेत सोनिया गांधींना ५ लाख ३३ हजार मते मिळाली, तर भाजपाचे दिनेश सिंग यांना ३ लाख ६५ हजार मते मिळाली होती. आजोबा, आजी, आई यांनी लढवलेल्या मतदारसंघात आता राहुल गांधी आपले नशीब आजमावून पाहत आहेत. **- डॉ. सुकृत खांडेकर**

# बदलत्या हवामानाचा परिणाम; राज्यात फक्त २८ टक्के जलसाठा; पाणीटंचाईचे संकट भिषण

**उन्हाचे** चटके चोहोबाजूंनी जाणवू लागले असतानाच राज्यात लघु,मध्यम व मोठ्या प्रकल्पात एप्रिलमध्ये ३८ टक्के जलसाठा होता आणि आता आणखी कमी होऊन केवळ २८ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक रहाला आहे.यामुळे पाणी टंचाईच्या झळा सर्वत्रच जाणवू लागल्याने राज्यातील २ हजार ३४४ गावात आणि ५ हजार ६०५ वाड्यांवर टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे.यामुळे यावर्षी पाणीप्रश्न अत्यंत गंभीर होण्याचा धोका व्यक्त होत आहे.येत्या काळात उन्हाचा पारा वाढल्याने पाण्याची भिषण टंचाई निर्माण होवू शकते याला नाकारता येत नाही.राज्यात मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी टँकरची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे.सध्याच्या परीस्थितीत राज्यातील धरणांची स्थिती अत्यंत गंभीर आहे अमरावती ४३.८४ टक्के,कोकण ४२.१२टक्के, नागपूर ४०.४३टक्के,नाशिक ३०.६५ टक्के, पुणे २३.६९ टक्के, मराठवाडा १३.४० टक्के, संभाजीनगर ११.८९ टक्के यावरून स्पष्ट होते की पाण्याच्या बाबतीत संभाजीनगर, मराठवाडा व पुणे अत्यंत चिंताजनक स्थितीत असल्याने तीव्रपाणी टंचाई दिसून येते.कारण राज्यातील २ हजार ९९४ प्रकल्पांची एकुण क्षमता ४० हजार ४८५ दशलक्ष घनमीटर आहे.सध्या या प्रकल्पामध्ये फक्त १५ हजार १८९ दशलक्ष घनमीटर पाणी साठा उरला आहे. म्हणजेच दिवसेंदिवस पाण्याची समस्या आणखीनच बिकट होण्याची शक्यता दिसत आहे.सध्या राज्यातील १८ ते २० धरणे कोरडी पडली आहेत.त्यामुळे येत्या काळात राज्याला तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार असल्याचे चिन्ह जवळपास निश्चित आहे.यावर्षी बदलत्या हवामानामुळे नेहमीपेक्षा कमी पाऊस झाल्याने उष्णतेच्या लाटे सोबतच पाण्याच्याही हाहाःकाराला आतापासूनच सुरूवात झाली आहे.दरवर्षी पावसाची कृपादृष्टी असणारा पश्चिम महाराष्ट्र यंदा पाण्यासाठी तडफतो आहे. त्यामुळे आतापासूनच टँकरग्रस्त झाला आहे.पुणे विभागातील कोल्हापूर जिल्हा वगळता पुणे, सातारा, सांगली, आणि सोलापूर या चार जिल्ह्यांतील विहिरींनी तळ गाठला आहे. यामुळे ३३४ गावातील ६ लाख ७२ हजार ८०७ नागरिकांना ३६४ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे.यावरून स्पष्ट होते की संपूर्ण महाराष्ट्रात पाण्याची टंचाई भेडसावणार आहे. याचे प्रायचित्य मानव, पशुपक्षी, संपूर्ण जीवजंतू, जंगल संपदा यांना आतापासूनच भोगावे लागत आहे.अजुन पावसाळ्याला दोन महिने बाकी आहे.राज्यासह देशातील जलाशय साठा निम्म्यावर आलेला आहे तर दुसरीकडे सुर्य आग ओकत आहे म्हणजेच पाण्याची समस्या आणि सुर्याचे आक्राळविक्राळ रूप आणि जलसाठा कमी होने यामध्ये पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवसृष्टीला यावर्षी अत्यंत कठीणायीचा सामना करावा लागण्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे. महाराष्ट्रासह देशातील बदलत्या हवामानामुळे सर्वत्र उष्णतेची लाट तर कधी अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे संपूर्ण जीवसृष्टी मानव, पशुपक्षी यांचे जीवन विस्कळीत होतांना दिसते तर दुसरीकडे वाढत्या तापमानामुळे पाण्याची समस्या दिवसेंदिवस अत्यंत बिकट होतांना दिसत आहे. विदर्भात नागपूर, यवतमाळ, अकोला, चंद्रपूर येथे उष्णतेची लाट कायम आहे तर मुंबईसह रायगड, ठाणे, पालघर येथे उकाडा वाढला आहे.म्हणजेच सुर्याने आपले उग्र रूप कळत न कळत सर्वत्र पसरविले आहे.त्यामुळे हवामान खात्याने महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांना उष्णतेच्या बाबतीत एलो अलर्ट घोषित केले आहे.अकोला ४४.३० अंश सेल्सिअस,सोलापुरचे तापमान ४३.१ अंश सेल्सिअस, चंद्रपूर ४०.८ अंश सेल्सिअस, वाशिम ४३ अंश सेल्सिअस, यवतमाळ ४२.२ अंश सेल्सिअस, नागपूर ४१.५ विदर्भातील सरासरी तापमान ४२ अंश सेल्सिअस, मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यातील तापमान ४० अंश सेल्सिअसची नोंद झाली.यावरून स्पष्ट होते की दिवसा तर उकाडा वाढलाच परंतु रात्रीही उकाड्याचे चटके संपूर्ण महाराष्ट्राला सहन करावे लागत आहे.हवामान खात्याने असेही वर्तविले आहे की मे ते जून महिन्यात देशातील अनेक भागातील उन्हाची झळ अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. त्यामुळे येणारे दोन महिने सर्वांनीच आपापली काळजी घेणे गरजेचे आहे.राज्यातच नाही तर देशातील अनेक भागात सुर्य आग ओकतांना दिसतो आणि हा संपूर्ण प्रकार दिवसेंदिवस बदलत्या हवामानामुळे निर्माण झालेला आहे.गंगेच्या खोऱ्यातील पश्चिम बंगाल,पूर्व झारखंड, उत्तर ओडिशा आणि रायलसीमा येथे कमाल तापमान ४४ ते ४७ अंश सेल्सिअसच्या आसपास रहाण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तविला आहे.यावर्षी वेळेच्या आधीच सुर्याने आक्राळ - विक्राळ रूप धारण केल्याचे दिसून येते आणि पुढे आणखी भयानक स्थिती निर्माण होवू शकते याला नाकारता येत नाही. कारण आतापासुनच नदी, तलाव, विहिरी, धरणे यांच्या पाण्याची पातळी कमी कमी होत आहे आणि ही परिस्थिती संपूर्ण महाराष्ट्रातच नाही तर देशासह संपूर्ण जगात आपल्याला पहायला मिळेल.आतापासुनच महाराष्ट्रात तापमानाचा पारा सिमापार करून पुढील काही दिवसांत कठीण परिस्थितीत निर्माण करण्याची भीती वर्तवली जात आहे.कारण मानवाने केलेला निसर्गाचा ह्रास यामुळेच आज आपल्याला उन्हाचे चटके व पाणी टंचाईचा सामना करावा लागतो आहे. त्याचप्रमाणे मानवाने केलेल्या पापाचे प्रायश्चित्त मानव तर भोगतच आहे सोबतच पशुपक्षी, संपूर्ण जीवसृष्टी, पृथ्वी, आकाश-पाताळ,नदी-नाले,तलाव, धरणे, विहिरी यांनाही भोगावे लागत आहे.कारण राज्यासह देशातील वाढते तापमान हे दिवसेंदिवस निसर्गावर सरळ प्रहार करीत असुन संपूर्ण निसर्गाचे संतुलन ढासळत आहे त्यामुळे ही गंभीर समस्या निर्माण झाली आहे.त्यामुळे नागरिकांनी वाढत्या तापमानापासुन स्वतःला सांभाळणे गरजेचो आहे.बदलत्या हवामानामुळे यावर्षी पाऊस कमी झाला. त्यामुळे आतापासूनच राज्यातील अनेक भागात आपल्याला भिषण पाणी टंचाई दिसून येत आहे.जलाशयामध्ये फक्त २८ टक्के जलसाठा उपलब्ध असल्याचे सांगितले जाते. म्हणजे एकीकडे तापमानात वाढ यामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम, तर दुसरीकडे पाणी टंचाई अशा डबल गंभीर समस्यांशी आपणा सर्वांना झुंज द्यावी लागणार आहे.

वाढत्या तापमानामुळे उष्णतेची व अवकाळी पावसाचे बादल महाराष्ट्रासह अनेक राज्यात दिसून येते.राज्यात वाढते तापमान पहाता आरोग्य विभागाने उष्माघातापासून बचाव करण्याचे आवाहन सुध्दा केले आहे.वाढत्या उष्णतामानामुळे उन्हात फिरल्याने डोके दुखी,ताप येणे, जास्त घाम येणे, चक्कर येणे, बेशुद्ध पडने अशा पध्दतीची साधारणतः उष्माघाताची लक्षणे जानवु शकतात.यावर प्रार्थमिक उपाय म्हणून स्वतःची काळजी घेणे गरजेचे आहे.

सावलीचा सहारा घेणे, थंड पेय घेणे,नारळाचे पाणी पिने, पाणी भरपूर पिने साधारणतः बाहेर निघताना कॉटनचे सैल कपडे घालावेत आणि जास्तच अस्वस्थ वाटत असेल डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.परंतु आज वाढत्या तापमानामुळे पशुपक्ष्यांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे त्यामुळे त्यांच्यासाठी आपापल्या पद्धतीने पाण्याची व्यवस्था केली पाहिजे व पशुपक्षांना वाढत्या तापमानापासुन दिलासा दिला पाहिजे. बदलते हवामान, पाणी साठा कमी होने, अती उष्णता, अवकाळी पाऊस याला रोखण्यासाठी राज्यासह देशात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे. यामुळे वातावरणात आमुलाग्र बदल झाल्याचे दिसून येईल व निसर्ग प्रफुल्लित राहील.

**- रमेश कृष्णराव लांजेवार**

# श्री तुळजाभवानी मंदिरातील सुमारे ८.५ कोटींच्या दानपेटी घोटाळा प्रकरणी समितीच्या लढ्याला यश!

तुळजापूर, दि. १० (प्रतिनिधी) - श्री तुळजाभवानी मंदिरात ८ कोटी ४५ लाख ९७ हजार रुपयांचा दानपेटी घोटाळा झाला होता. या भ्रष्टाचारात सरकारी अधिकारी गुंतले आहेत म्हणून प्रशासन त्यांना वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत, असे ताशेरे ओढत या घोटाळ्याचा तपास बंद करण्याचा शासनाचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपिठाने रद्दबातल ठरवला आहे.

तसेच आधीच्या चौकशी समितीने दोषी ठरवलेले लिलावदार, मंदिर कर्मचारी, विश्वस्त, शासकीय अधिकारी-कर्मचारी आदी १६ दोषींवर तुळजापूर पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच या प्रकरणाचा तपास गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलीस अधीक्षक दर्जाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली चालू ठेवण्याचे आदेशही दिले आहे. आई तुळजाभवानीच्या कृपेने गेली ९ वर्षे न्यायालयीन लढा देणाऱ्या हिंदु जनजागृती समिती आणि हिंदु विधीज्ञ परिषद यांच्या प्रयत्नांना मोठे यश आले आहे, तसेच महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, गोवा यांसह देशभरातील कोट्यवधी देवीभक्तांना आनंद आणि दिलासा देणारा हा निर्णय आहे. देवनिधी लुटणाऱ्या भ्रष्टाचाऱ्यांना शिक्षा होईपर्यंत आम्ही या प्रकरणाचा पाठपुरावा करू, असे हिंदु जनजागृती समितीने म्हटले आहे.

वर्ष १९९१ ते २००९ या काळात दानपेटीच्या लिलावात कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्यावर विधिमंडळात चर्चा



झाली. तत्कालीन मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी दिलेल्या निर्देशानुसार वर्ष २०११ मध्ये या घोटाळ्याची राज्य गुन्हे अन्वेषण विभागामार्फत चौकशी चालू झाली; मात्र यात प्रशासकीय अधिकारी आणि लोकप्रतिनिधी गुंतलेले असल्यामुळे ५ वर्षे झाले, तरी चौकशी पुढे सरकत नव्हती. त्यामुळे हिंदु जनजागृती समितीने हिंदु विधीज्ञ परिषदेच्या साहाय्याने उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपिठात वर्ष २०१५ मध्ये जनहित याचिका दाखल केली. अखेर न्यायालयाच्या आदेशानुसार वर्ष २०१७ मध्ये चौकशी अहवाल गृह विभागाला सादर झाला; मात्र पाच वर्षे झाले, तरी त्यावर कारवाई होत नसल्यामुळे वर्ष २०२२ मध्ये पुन्हा समितीने याचिका दाखल केली होती.

त्यावर 'पाच वर्षे झाली, तरी दोषींवर कारवाई का करण्यात आली नाही ?', अशी विचारणा उच्च न्यायालयाने शासनाला केली. तेव्हा शासनाने हे प्रकरण जुने असल्याचे सांगून चौकशी बंद केल्याचे समोर आले. सर्वोच्च न्यायालयाच्या 'ललिताकुमारी विरुद्ध उत्तर प्रदेश सरकार, २०१४(२) एस्.सी.सी.क्र.१' प्रकरणात 'दखलपात्र गुन्हा घडल्यावर फौजदारी गुन्हा नोंदवण्याचे' आदेश दिले आहेत. त्याचा उद्देश सार्वजनिक दायित्व, दक्षता आणि भ्रष्टाचार थोपवणे या दृष्टीने आवश्यक असते, हे न्यायालयाच्या निदर्शनास आणले. यावर ८.४५ कोटी रुपयांची लुट झालेली असतांना शंकर केंगार समितीनुसार दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करणे योग्य असल्याचे सांगून न्यायालयाने तपास चालू ठेवण्याचे आदेश दिले आहेत. न्यायमूर्ती मंगेश पाटील आणि न्यायमूर्ती शैलेश ब्रह्मे यांच्या खंडपिठासमोर समितीच्या वतीने ज्येष्ठ अधिवक्ता संजीव देशपांडे, हिंदु विधीज्ञ परिषदेचे संस्थापक सदस्य अधिवक्ता (पू.) सुरेश कुलकर्णी तथा अधिवक्ता उमेश भडगावंकर यांनी कामकाज पाहिले.

## मराठी सिनेमाला सातासमुद्रापार नेणाऱ्या 'सैराट'ला आठ वर्षे पूर्ण!

मुंबई, दि. १० (प्रतिनिधी) - मराठी सिनेसृष्टीत दर्जेदार सिनेमांचा तुटवडा जाणवत असताना एक असा सिनेमा आला की ज्याने मराठी सिनेमांचं समीकरणच बदलून टाकलं. मराठी सिनेमाला सातासमुद्रापार नेणाऱ्या या सिनेमाने मराठीत आजवरची सर्वाधिक १०० कोटींची कमाई केली. तो म्हणजे नागराज मंजुळे दिग्दर्शित 'सैराट' सिनेमा या सिनेमाने नावाप्रमाणेच प्रेक्षकांना सैराट करुन सोडलं. आजही कोणत्याही कार्यक्रमात 'झिंगाट' गाण्यावर नाचल्याशिवाय लोकांचं मन भरत नाही, ही या सिनेमाची आणि अजय-अतुलच्या संगीताची जादू आहे.

'सैराट' सिनेमाला आज आठ वर्षे पूर्ण झाली. या निमित्ताने या चित्रपटाची नायिका रिंकू राजगुरु म्हणजेच सगळ्यांची लाडकी आर्ची हिने आर्ची-परशाचे काही अनसीन फोटोज शेअर केले आहेत. पडद्यामागील रिंकू-आकाशची धमाल, घोडेस्वारी करतानाचा फोटो आणि तिचं पहिलं फोटोशूट या फोटोंनी सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे.

## अस्थी नदीत विसर्जित करण्याऐवजी जमिनीत खड्डा खोदून त्यात टाकून पांच आम्रवृक्षाचे रोपण



कै.जगन्नाथ गव्हाणे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आम्ररोपटी लावताना आप्तेष्ट व नातेवाईक.

वैजापूर, दि. १० (प्रतिनिधी) - येथील जेष्ठ नागरिक जगन्नाथ रामराव गव्हाणे यांचे काल गुरुवार रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यू समयी ते ७५वर्षांचे होते. शुक्रवार (ता.१०) रोजी अस्थी विसर्जन दिन त्यांची पत्नी शेवंताबाई जगन्नाथ गव्हाणे व मुलं अनुक्रमे डॉ. संजय गव्हाणे व मनोज गव्हाणे यांनी या अस्थी नदीत टाकून विसर्जित करण्यापेक्षा वडिलांच्या इच्छेखातर त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ माती खोदून त्यात अस्थी टाकून पांच आम्रवृक्ष रोपटी येथील अमरधाम मध्ये लावून आणखी वृक्ष लावून पर्यावरण समतोल राखण्यासाठी या परिवाराने संकल्प केला.



कै.जगन्नाथ गव्हाणे

या प्रसंगी जेष्ठ नागरिक संघाचे सचिव धोंडीरामसिंह राजपूत यांच्या हस्ते ही आम्रवृक्ष लावण्यात आले.

कै. जगन्नाथ रामराव गव्हाणे यांच्या पश्चात पत्नी, दोन विवाहित मुले, एक विवाहित मुलगी सुनीता आसाराम जाधव, सुना-प्रा. मीना संजय गव्हाणे व माया मनोज गव्हाणे नातवंडे असा परिवार आहे.

या वृक्षारोपण समयी हभप कडू महाराज गवांदे, फौजी गौतम गायकवाड, डॉ. दिनेश राजपूत, डॉ. महाडिक, मच्छिंद्र बोराडे, किशोर देवकर, श्री. पवार यांच्यासह देवगाव रंगारी, सिल्लेगाव येथील नागरिक व आप्तेष्ट उपस्थित होते.

## दहावी, बारावीच्या परीक्षा शुल्कात 'इतक्या' टक्क्यांनी वाढ

मुंबई, दि. १० (प्रतिनिधी) - महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या वतीनं घेण्यात येणाऱ्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक परीक्षांचे निकाल काही दिवसांतच जाहीर होणार असल्यामुळे विद्यार्थ्यांची धाकधूक वाढली आहे. निकालांपूर्वीच्या वातावरणात येत्या वर्षी म्हणजेच २०२४-२५ या शैक्षणिक वर्षादरम्यान दहावी आणिबारावीच्या परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची माहिती समोर आली आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी तसेच बारावीच्या परीक्षा शुल्कात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. येणाऱ्या शैक्षणिक वर्षादरम्यान होणाऱ्या परीक्षांसाठी १२ टक्के शुल्कवाढ करण्यात आली असून विद्यार्थ्यांना प्रशासकीय शुल्क, गुणपत्रिका शुल्क, प्रमाणपत्र शुल्क, प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क यासाठीही विद्यार्थ्यांना पैसे भरावे लागणार आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, छपाई आणि स्टेशनरी महागल्यामुळे दहावी बारावीच्या परीक्षा शुल्कात वाढ करण्यात आल्याचं स्पष्ट झालं आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या दहावी बारावीच्या परीक्षा शुल्कात वाढ करण्याचा निर्णय राज्य मंडळ कार्यकारी परिषदेने घेतला आहे.

### इतक्या रुपयांची परीक्षा शुल्कात वाढ

राज्य शिक्षण मंडळ कार्यकारी परिषदेच्या वतीनं इयत्ता दहावीच्या परीक्षा शुल्कात ५० ते १०० रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. सदर निर्णयानंतर १७ नंबरचा परीक्षा अर्ज, नावनोंदणी शुल्कही महागलं आहे. १७ नंबरचा अर्ज/ फॉर्म भरून खासगीरित्या दहावीच्या परीक्षेला बाहेरून बसणाऱ्या विद्यार्थ्यांना आता सर्वाधिक परीक्षा शुल्क भरावं लागणार आहे.

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं नियमित विद्यार्थ्यांसाठी परीक्षा शुल्क ४२० रुपयांवरून ४७० रुपये केलं आहे. तर, १७ नंबरच्या फॉर्ममध्ये ३० रुपयांनी, तर नावनोंदणी शुल्कात ११० रुपयांची वाढ केली आहे. राज्य शिक्षण मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी जुलै-ऑगस्ट २०२४ आणि मार्च २०२५ मध्ये होणाऱ्या दहावीच्या परीक्षेसाठी सुधारित शुल्काचे दर जाहीर केले असून आता दहावी, बारावीच्या परीक्षार्थींना अधिकची रक्कम मोजावी लागणार आहे.

## दगडूशेठ हलवाई गणपतीला ११ हजार आंब्यांचा महानैवेद्य!



पुणे, दि. १० (प्रतिनिधी) - साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या अक्षयतृतीयेच्या मंगलदिनी अनेक मंदिर सजवून पूजा घालण्यात येतात. याचप्रकारे पुणे शहरातील सर्वस्व मानले जाणाऱ्या दगडूशेठ गणपतीची भव्य स्वरुपात आरास केली आहे. या गणरायाला आज ११ हजार आंब्यांचा महानैवेद्य दाखविण्यात आला असून प्रवेशद्वारापासून गाभाऱ्यापर्यंत फुलांनी केलेली सजावट अशा मनोहारी वातावरणात स्वराभिषेक करण्यात आला. अक्षयतृतीयेच्या निमित्ताने गणराया चरणी गायिका मनीषा निश्चल आणि सहकार्यांनी गायन सेवा अर्पण केली पहाटे ब्राह्मणस्पती सुप्त अभिषेक करण्यात आला.

आब्यांची आरास पाहण्यासोबतच गणरायाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी पहाटेपासून मोठी गर्दी केली. आंब्याचा प्रसाद ससूनमधील रुग्ण, वृद्धाश्रम, अनाथाश्रम येथील मुले तसेच गणेशभक्तांना देण्यात येणार आहे. आंब्यांचे व्यापारी देसाई बंधु आंबेवालेचे मंदार देसाई आणि परिवाराच्या वतीने हा नैवेद्य देण्यात आला.

## नोंदणी व मुद्रांक विभाग; महसूल संकलनाची विक्रमी ११२ टक्के उद्दिष्टपूर्ती मार्चअखेर २८ लाख दस्तांची नोंदणी पूर्ण - नोंदणी महानिरीक्षक हिरालाल सोनवणे

मुंबई, दि. १० (प्रतिनिधी) - यंदाच्या शैक्षणिक सत्रात इंडियन इन्स्टीट्युट ऑफ हॅन्डलूम टेक्नॉलीजी, बरगढ, ओडिशा येथील तीन वर्षीय हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविकेच्या प्रथम व व्दितीय वर्षासाठी महाराष्ट्रातील पात्र उमेदवारांची निवड करण्यात येणार आहे. यासाठी प्रवेश अर्ज मागविण्यात आले असून इच्छूक उमेदवारांनी परिपूर्ण अर्ज १० जूनपर्यंत संबंधित प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग कार्यालयाकडे सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

केंद्र शासनाच्या भारतीय तंत्रविज्ञान संस्थेतील सन २०२४-२५ या शैक्षणिक सत्राकरिता तीन वर्षीय (सहासत्रीय) हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी महाराष्ट्र राज्यातून बरगढ (ओडीशा) साठी १३ जागा व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकासाठी १ जागा राखीव आहेत.

तसेच वेंकटगिरीसाठी २ जागा तसेच द्वितीय वर्षासाठी ३ जागांपैकी आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकासाठी १ जागा राखीव असून प्रवेशासाठी पात्र उमेदवारांची निवड करण्यासाठी प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग, नागपूर, सोलापूर, मुंबई, औरंगाबाद यांच्यामार्फत विहित नमुन्यात प्रवेश अर्ज १० जूनपर्यंत मागविण्यात आले आहेत.

त्याअनुषंगाने इच्छुक उमेदवारांनी आपले परिपूर्ण अर्ज १० जूनपर्यंत संबंधित प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग कार्यालयाकडे सादर करावे. प्रवेश अर्जाचा नमुना व इतर अनुषंगिक माहिती वस्त्रोद्योग आयुक्तालयाचो www.dirtexmah.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

तसेच अर्जाचा नमुना सर्व प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग यांचे कार्यालयात देखील उपलब्ध आहे, असे वस्त्रोद्योग आयुक्त अविष्यांत पंडा यांनी कळविले आहे.

## नाशिक जिल्ह्यातील हक्काचे पाणी मराठवाडा व खास करून वैजापूर-गंगापूरला मिळालेच पाहिजे

**मराठवाडा** विभागाची पाण्याची गरज लक्षात घेता. नाशिक, अहमदनगर जिल्ह्यातील धरणांची उंची वाढविली आहे. या वाढलेल्या पाण्यावर मराठवाडा विभागाचा हक्क आहे.

मराठवाड्याला पाणी देण्याच्या अटीवर नगर व नाशिकचे धरण उभारलेले आहेत. नांदूर-मध्यमेश्वर एक्सप्रेस कालवा, असेल किंवा पालखेड डावा कालवा याचे पाणी हे वैजापूर -गंगापूर चे हक्काचे पाणी आहे.

हे सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या निर्णयाने सिध्द झाले असतानाही मुद्दामहन मराठवाड्याला त्यांचे हक्काचे पाणी न देणे, या विभागातील पाण्यासाठी तळपणाऱ्यांना त्यांच्या हक्काच्या पाण्यासाठी तळपत ठेवणे व त्यांच्या हकाच्या पाण्यावर डल्ला मारणे व मराठवाडा लोकांचे हाल, हाल करणे हे कुठे तरी थांबायला हवे, पश्चिम महाराष्ट्रच्या अधिकारी वर्गाची ही हुकूमशाही व मक्तेदारी त्वरित थांबविण्यासाठी कायम स्वरूपी तोडगा काढण्यास्तव मराठवाडा विभागाच्या लोकप्रतिनिधींनी संघटितपणे शासन दरबारी आपली न्याय व हक्कपूर्ण मागणी न्याय मिळत नाही तोपर्यंत लढा, संघर्ष, पाठपुरावा करण्याची प्रतिज्ञा करावी व लढा सातत्याने पुढे नॉन स्टॉप चालवावा ही विनंती.

**- धोंडीरामसिंह राजपूत**

# सामर्थ्य आहे इच्छाशक्तीचे

आरोग्य सुधारण्यासाठी प्रयत्न करण्याची प्रत्येकाची इच्छा असते. ही ध्येये साध्य करण्यासाठी काय करायचे, हे सुद्धा त्यांना माहिती असते. पण प्रत्यक्षात येत नाही. प्रबळ इच्छाशक्ती असेल, तर असे कदापिही होत नाही, असे मानले जाते. पण ही इच्छाशक्ती किंवा 'विल पॉवर' प्राप्त कशी करायची?

दैनंदिन आरोग्य सुधारण्यासाठी, एखादा चांगला उपक्रम करण्याची अनेकांची इच्छा असते. कुणाला लवकर उठायचे असते, कुणाला नियमितपणे व्यायामाला जायचे असते, कुणाला चहा- सिगारेटचे व्यसन सोडायचे असते, तर कुणाला क्रोधावर ताबा मिळवायचा असतो. ही ध्येये साध्य करण्यासाठी काय करायचे, हे सुद्धा त्यांना पक्के माहिती असते. पण काही केल्या ते जमत नाही. कारण इच्छा असते, पण ती दुर्बळ असते. इच्छाशक्ती प्रबळ असेल, तर असे कदापिही होत नाही, असे मानले जाते. पण ही इच्छाशक्ती किंवा 'विल पॉवर' प्राप्त कशी करायची, हा एक गहन प्रश्नच असतो.

शरीरातले स्नायू सशक्त करायचे असतील, तर त्यासाठी वेटलिफ्टिंग किंवा तत्सम व्यायाम करावे लागतात. पण असा व्यायाम दिवसातला एखादा तासच करायचा असतो. दिवसभर वजने उचलत बसलात, तर नक्कीच शक्तिपात होईल आणि पुढे कित्येक दिवस हलता-चालतासुद्धा येणार नाही. इच्छाशक्तीचे असेच असते. ती सदैव सतत वापरायची नसते. आजच्या दुनियेत प्रत्येक गोष्ट सबुरीनेच घ्यावी लागते. कुठलेही काम असो, वेळेवर आणि हवे तसे होईल असे कधीच होत नाही.

अगदी सकाळी कामावर जाताना रस्त्यावरच्या तुडुंब गर्दीचा सामना करत उशीर होतोच आणि कुठलेही काम करायचे म्हटले की त्यात अडथळे येतातच. त्यामुळे या बाबतीत, 'मला जे वाटते, तसेच प्रत्येक ठिकाणी व्हायला हवे' हा आग्रह कामाचा नसतो.

सकारात्मक कल्पनाशक्ती — काही मनोवैज्ञानिकांनी एक प्रयोग केला. सुमारे १०० तरुणांना एकत्र आणले. त्यांचे तीन गट करून त्यांना एक सिनेमा दाखवला. त्यावेळी त्यांच्यासमोर चॉकोलेट्सच्या डिशेस ठेवल्या.

पहिल्या गटाला सांगितले की तुम्ही हवी तेवढी चॉकोलेट्स खा.

दुसऱ्या गटाला सांगितले की अजिबात चॉकोलेट खायचे नाही, तिसऱ्या गटाला सांगितले की खा, पण सिनेमा संपल्यावर, मग हवी तेवढी खा, प्रयोगाच्या शेवटी लक्षात आले की ज्यांना भरपूर खा म्हणून सांगितले त्यांनी ती खाल्लीच, पण ज्यांना खाऊ नका म्हणून सांगितले होते, त्यांनीही चोरून खाल्ली. तिसऱ्या गटाने मात्र सांगितले, की आधी खावीशी वाटत होती, पण सिनेमा संपल्यावर जेव्हा खा म्हणून सांगितले, तेव्हा ती विशेष करून खाल्ली गेली नाहीत.

आपल्या दैनंदिन जीवनात ज्या सकारात्मक आणि चांगल्या गोष्टी आपल्याला तीव्रतेने कराव्यात असे वाटत असते, त्या त्वरित कार्यान्वित केल्या, तर नक्की होतात. पण पुढे ढकलल्या तर त्या होत नाहीत. म्हणजे तुम्हाला व्यायाम सुरू करायचा असेल, गाणे शिकायचे असेल, तर विचार पुढे ढकलू नका. निर्णयाचा ऊहापोह करण्यात वेळ घालवू नका.

ज्या गोष्टी तुम्हाला बंद करायच्या आहेत, टाळायच्या आहेत, त्या जेव्हा तीव्रतेने कराव्याशा वाटतात, त्याला 'क्रेव्हिंग' म्हणतात. असे क्रेव्हिंग आले, की त्या गोष्टी थोड्या वेळाने करू असे स्वतःला ठासून सांगा. मग पाहा, थोडा वेळ गेल्यावर ही तीव्रता नक्की कमी होते. धूम्रपान, क्रोध व्यक्त करणे, मद्यपान करणे याकरिता तो क्षण पुढे ढकलण्यासाठी लागणारी ही वेळ ३ ते ७ मिनिटे असते.

इच्छाशक्ती वाढवण्यासाठी रिलॅक्सेशन टेक्निक्सचा वापर करता येतो. मन एकाग्र करून पूर्ण रिलॅक्सेशन झाल्यावर, आपल्याला ज्या चांगल्या गोष्टी करावयाच्या आहेत, त्या घटना क्रमवारीने मन:पटलावर आणाव्यात. यासाठी आपल्या कल्पनाशक्तीचा आधार घ्यावा. अशाच पद्धतीने ज्या टाळायच्या गोष्टी आहेत, त्याबाबतदेखील करावे. वरचेवर हे केल्यास त्या नक्की घडतात असा मनोशास्त्रवैज्ञानिकांचा दावा आहे.

काही पथ्ये

इच्छाशक्ती वाढण्यासाठी काही व्यवधानेही पाळावी लागतात. उदाहरणार्थ, मनात नको ती गोष्ट करण्याची तीव्र इच्छा निर्माण झाल्यास, प्रचंड तणाव निर्माण होतो. या तणावाला सामोरे जाण्यासाठी मन शांत करणारे संगीत, एखादा छंद, घरातल्या लहानग्यांशी खेळणे, पाळीव प्राण्यांना फिरायला नेणे अशा गोष्टींनी हा तणाव सुकर करता येतो.

कुठलीही उद्दिष्टे पार पाडायची असतील तर एकावेळी एकच गोष्ट पूर्ण करावी. म्हणजे सिगारेट सोडेन, कामावर वेळेवर जाईन, क्रोधाचा स्फोट होऊ देणार नाही, अशा असंख्य गोष्टी एकाच वेळी साध्य करण्याऐवजी क्रमाक्रमाने हे एकेक इप्सित पूर्ण करावे.

दुसऱ्याला खुश करण्यासाठी स्वतः काही गोष्टी करणे टाळावे. अशामुळे आपल्या इच्छाशक्तीचा ऱ्हास होतो. तुम्हाला स्वतःला जे करावेसे वाटते, तुम्हाला जे मनापासून आवडते अशीच गोष्ट साध्य करा. ती गोष्ट यशस्वीपणे पार पडल्याचा आनंद तुमच्या अंतर्मनाला व्हायला हवा.

आपल्या जीवनशैलीत बदल आणि आरोग्यात सुधारणा करण्यासाठी स्वयंशिस्तीचा प्लॅन आखावाच लागतो. दुर्बळ इच्छाशक्ती असलेल्या व्यक्तींना, नकोशा सवयींपासून मुक्तता मिळवण्यासाठी इच्छाशक्तीच्या प्राबल्याची गरज असते, कारण 'सामर्थ्य आहे इच्छाशक्तीचे, जो जे करील तयाचे.'

**- डॉ. अविनाश भोंडवे**

(लेखक ज्येष्ठ आरोग्य विश्लेषक आणि पुण्यातील फॅमिली डॉक्टर आहेत. इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र शाखेचे ते माजी अध्यक्ष आहेत.)

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरुणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो.:९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# पडेगाव घनकचरा प्रक्रिया केंद्रावर आता कायमस्वरूपी अग्निशमन सुरक्षा यंत्रणा

## दहा हजार लिटर क्षमतेचे ०३ टँकर मनपा सेवेत दाखल



छत्रपती संभाजीनगर दि.१० (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेव्दारे चिकलठाणा, पडेगाव व हर्सल घनकचरा प्रक्रिया केंद्रांवर कायमस्वरुपी अग्निशमन सुरक्षा यंत्रणा बसविण्यात येणार आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिके मार्फत चिकलठाणा, पडेगाव व हर्सूल येथे घनकचरा प्रक्रिया केंद्र उभारण्यात आलेले असुन, सदरील केंद्रांवर शहरात दैनंदिन उत्पत्ती होणारा कचरा आणून त्यावर प्रक्रिया केली जाते. घनकचरा प्रक्रिया केंद्रांवर मोठ्या प्रमाणावर कचरा जमा होत असल्याने, याठिकाणी आग लागण्याच्या घटना वारंवार घडत असतात. अशावेळी अग्निशमन विभागाच्या फायर टेंडर्सव्दारे आग विझवण्यात येते. परंतु फायर टेंडर्स येवून आग विझवण्यासाठी बराच वेळ लागतो व तोपर्यंत आग पसरुन मोठी दुर्घटना होण्याची संभावना असते. त्यामुळे आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या आदेशानुसार सदरील तीनही घनकचरा प्रक्रिया केंद्रांवर कायमस्वरुपी अग्निशमन सुरक्षा यंत्रणा बसविण्याठी जाहीर निविदा मागवून मे. तिरुपती, ईलेक्ट्रीकल्स सेल्स अँड सर्व्हिसेस यांची नियुक्ती करण्यात आली.

एजन्सीमार्फत प्रत्येक घनकचरा प्रक्रिया केंद्रावर १०० एच.पी. क्षमतेचा ०१ मुख्य पंप, १५ एच.पी. क्षमतेचा ०१ जॉकी पंप व १०० बी.एच.पी. क्षमतेचा ०१ किर्लोस्कर डिजेल पंप तसेच १७ हायड्रंट व्हॉल्व व १४ वॉटर मॉनिटर अशी यंत्र सामुग्री बसविण्यात आली आहे. चिकलठाणा, पडेगाव व हर्सूल घनकचरा प्रक्रिया केंद्रांवर कायमस्वरुपी अग्निशमन सुरक्षा यंत्रणा बसविण्याठी एकुण रु. १,६७,८४,२७३/- खर्च झालेला आहे. सद्यस्थितीत पडेगाव येथील काम पूर्ण झाले असुन, हर्सूल व चिकलठाणा येथील काम अगामी २० दिवसांमध्ये पुर्ण होणार आहे. आज पडेगाव घन कचरा प्रक्रिया केंद्रावर बसविण्यात आलेल्या कायमस्वरूपी अग्निशमन सुरक्षा यंत्रणेचे व ०३ नवीन टँकरचे लोकार्पण मा.अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी मा.शहर अभियंता ए.बी देशमुख,उप आयुक्त तथा घनकचरा व्यवस्थापन कक्ष प्रमुख रविंद्र जोगदंड,कार्यकारी अभियंता यांत्रिकी अमोल कुलकर्णी,कर्मचारी यांची उपस्थिती होती.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे १०,००० लि क्षमतेचे ०३ वॉटर टँकर्स १५ वर्षे जास्त वयोमानाचे असल्यामुळे शासनाच्या नियमा नुसार स्क्रैप करण्यात आले आहेत. त्यानुषंगाने १० हजार लि. क्षमतेच्या वॉटर टँकर्ससाठी जीईएम पोर्टलद्वारे निविदा मागवुन १६ टन जीव्हीडब्ल्यु क्षमतेच्या ०३ चेसीस मे. अशोक ले लॅन्ड लि. यांचेकडुन खरेदी करण्यात आले आहेत. सदरील चेसीसवर जाहीर निविदा मागवुन मे. ॲक्टिव्ह मोटर्स यांचे कडुन १० हजार लि. क्षमतेचे ०३ टैंकर्स उभारणी करुन घेण्यात आले आहेत. सदरील टँकर्स प्रति नग रु ३०,२८,२९०/- दराने एकुण रु ९०,८४,८७०/- रकमेत खरेदी करण्यात आले असुन, खरेदी करण्यात आलेल्या टँकर्सचा वापर शहरातील झाडांना पाणी देणे, डिवायडर धुणे, रस्ते धुणे, लिचेट वाहतुक करणे इत्यादी कामासाठी करण्यात येणार आहे.अशी माहिती कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी दिली आहे.

# अतिक्रमण कारवाईमध्ये अडथळा निर्माण केल्या प्रकरणी गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर दि.१० (प्रतिनिधी)- रस्त्यावरील अतिक्रमण काढताना इमारत निरीक्षक यांना धक्काबुक्की व सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महानगरपालिका अतिक्रमण हटवा विभाग मार्फत सध्या शहरातील वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या व रस्ता बाधित व नागरिकांना अडचण निर्माण करणाऱ्या अतिक्रमण धारका विरुद्ध कारवाई प्रस्तावित करण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने दिनांक ९ मे रोजी सायंकाळी नऊ वाजता अतिक्रमण विभागाचे कंत्राटी अतिक्रमण निरीक्षक रवींद्र देसाई हे गस्त घालत असताना बजरंग चौक येथील वाहतूक अडथळा करणाऱ्या विरुद्ध अतिक्रमांची कारवाई करत होते. त्याच दरम्यान एका पाणीपुरीची गाडी जप्त करण्याच्या प्रयत्न करीत असताना त्या ठिकाणी एक सामाजिक कार्यकर्ता येऊन तुम्ही खूप दादागिरी करत आहेत गरिबांना त्रास देत आहे हे अतिक्रमण काढू नका असं बोलून त्याने देसाई यांचा शर्ट धरला व बाजूला केला व सरकारी कामात अडथळा निर्माण केला व ती हातगाडी बाजूला लोटून घेतली.सबंधित व्यक्ती सोबत इतर दोन जण होते त्यांनी सुद्धा बऱ्याच प्रमाणात कारवाईस विरोध केला. याबाबत इमारत निरीक्षक यांनी लगेच वरिष्ठांची परवानगी घेऊन व संबंधित पोलीस स्टेशनला फोन करून पोलिसांची मागणी केली असता पोलीस येतच सदर व्यक्ती जाय मोक्यावरून पळून गेली.परंतु अतिक्रमण निरीक्षक देसाई यांनी या गडबडीत सुध्दा त्या व्यक्तीच्या गाडीचा नंबर टिपला व याबाबत सिडको पोलीस स्टेशनमध्ये ३५३ इतर कलमाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

महानगरपालिकेच्या वतीने सध्या नागरिकांच्या मागणीनुसार नागरिकांच्या तक्रारीच्या अनुषंगाने प्रथम रस्त्यावरील अतिक्रमणे काढण्याची कारवाई मोठ्या प्रमाणात सुरू आहे. शहरात सध्या शहागंज ,सिटी चौक, गुलमंडी ,औरंगपुरा, गजानन महाराज मंदिर सह हडको टीव्ही सेंटर या रस्त्यावर कारवाई सुरूच आहे. या भागातील सुद्धा नागरिकांची मागणी होती व वेळोवेळी या भागातील या हातगाडी धारका विरोध कारवाई करणे पूर्वी त्यांना सूचनाही देण्यात आली होती व देण्यात येत आहे.महानगर पालिकेतर्फे कोणासही जाणून-बुजून किंवा दडपशाही किंवा हुकूमशाही करत नाही प्रथम त्यांना व्यवस्थित समजावून सांगून व त्यांना पूर्ण कल्पना देऊन नंतरच कारवाई प्रस्तावित करण्यात येते. शहरात सध्या अनेक ठिकाणी अनेक हातगाडी चालक अनेक वाहतूक धारक या महानगरपालिकेच्या पथकास सहकार्य करत आहे.

परंतु काल अचानक ही घटना घडल्याने पथकास धक्काबुक्की केल्याने या लोकाविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. महानगरपालिका प्रशासन नागरिकांच्या तक्रारीच्या अनुषंगाने व नागरिकांच्या मागणीनुसार व प्राप्त ऑनलाईन तक्रारी , निवेदन त्या अनुषंगाने शहरातील रस्ते अडथळा मुक्त करत आहे.यामुळे अनेक नागरिकांनी मनपाच्या कामाची प्रशंसा देखील केली आहे. तरी शहरातील नागरिकांनी अतिक्रमण कारवाई बाबत मनपा प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

# पैठणकडे जाणाऱ्या जड वाहतुक मार्गात बदल; पोलीस अधीक्षकांचे आदेश

छत्रपती संभाजीनगर दि.१० (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर ते पैठण दरम्यान महाराष्ट्र जीवन प्राधिकरणतर्फे जलवाहिनी टाकण्याचे काम सुरु आहे. हे काम वेळेत पूर्ण करण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश असून त्यासाठी या मार्गावरील जड वाहतुकीच्या मार्गात बदल करण्यात येत असल्याचे आदेश पोलीस अधीक्षक मनिष कलवानिया यांनी निर्गमित केले आहेत.

आदेशात दिल्यानुसार वाहतुक मार्गातील बदल याप्रमाणे-छत्रपती संभाजीनगर ते पैठण कडे जाणारी जड वाहतुक ही छत्रपती संभाजीनगर- निजलगाव फाटा- एल ॲण्ड टी मार्गे डीएमआयसी रोड मार्गे पैठणकडे जातील.

पैठण ते छत्रपती संभाजीनगर कडे जाणारी जड वाहतुक ही पैठण डीएमआयसी रोड- एल ॲण्ड टी निजलगाव फाटा येथून छत्रपती संभाजीनगर कडे जातील. जालना रोड वरील करमाडमार्गे- कचनेर कमात- कचनेर गाव- पोरगाव फाटा- बिडकीन- निजलगाव फाटा- बिडकीन- शेक्टा फाटा- इसारवाडी फाटा ते अहमदनगर कडे जाणारी जड वाहतुक ही जालना रोड- करमाद-केंब्रीज चौक- झाल्टा फाटा- अंबिका हॉटेल ते सोलापूर धुळे हायवे नं ५२ वरुन गांधेली- सातारा- ए.एस. क्लब मार्गे अहमदनगर व पुणे, धुळे, नाशिककडे जातील.

अहमदनगर- इसरवाडी फाटा- बिडकीन- कचनेर कमान- करमाड मार्गे जालना कडे जाणारी जड वाहतुक ही अहमदनगर पुणे रोडवरील इसारवाडी फाटा- वाळुज ए.एस. क्लब चौकातून सोलापूर धुळे एनएच नं ५२ मार्गे सातारा- गांधेली आडगाव बु. हॉटेल अंबिका- झाळटा फाटा- केंब्रिज चौक ते जालना कडे जातील. सोलापूर- धुळे मार्गाने कचनेर कमाने, पोरगाव फाटा, एल. ॲण्ड टी कंपनी , बिडकीन, शेक्टा फाटा इसारवाडी फाटा ते अहमदनगर पुणे कडे जाणारी जड वाहतुक ही अहमदनगर पुणे रोडवरील इसारवाडी फाटा- वाळूज – ए.एस. क्लब – सोलापूर धुळे महामार्ग ५२ वरुन सातारा गांधेली- निपाणी- कचनेर कमान मार्गे सोलापूरकडे जातील. हा बदल दि.१० मे पासून पुढील आदेशापर्यंत राहील असे पोलीस अधीक्षक मनिष कलवानिया यांनी आदेशात नमूद केले आहे.

# तुरुंगात जाणे किंवा पक्ष बदलणे, हे दोनच पर्याय माझ्याकडे शिल्लक होते

## शिंदे गटाचे नेते रवींद्र वायकरांचा गौप्यस्फोट

मुंबई दि.१० (प्रतिनिधी)- शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि उत्तर पश्चिम मुंबई लोकसभेचे महायुतीचे उमेदवार रवींद्र वायकर यांनी काही दिवसांपूर्वीच ठाकरे गटाला जय महाराष्ट्र करत शिंदे गटात प्रवेश केला होता. त्यानंतर त्यांना याठिकाणी उमेदवारी जाहीर करण्यात आली. यावर आता रवींद्र वायकर यांनी आपली भूमिका व्यक्त केली आहे. महाराष्ट्र टाइम्सला दिलेल्या मुलाखतीमध्ये ते म्हणाले, मला चुकीच्या पद्धतीने भ्रष्टाचाराच्या प्रकरणात गोवण्यात आले होते. तुरुंगात जाणे किंवा पक्ष बदलणे, हे दोनच पर्याय माझ्याकडे शिल्लक होते. त्यामुळे जड अंतःकरणाने मी पक्ष बदलला. माझ्यावर तर दबाव होताच, पण माझ्या पत्नीचेही नाव गोवल्यांतर माझ्यापुढे पर्याय उरला नाही.’ मुंबईमध्ये २० मे रोजी लोकसभेसाठी मतदान होणार आहे. त्याआधीच वायकर यांनी व्यक्त केलेल्या भूमिकेमुळे विरोधकांना मात्र आयताच मुद्दा मिळाला.

रवींद्र वायकरांनी यावेळी आपल्याला भावनांना वाट मोकळी करून दिली. ‘शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या वेळेपासून मी हाती शिवबंधन बांधले. बाळासाहेबांच्या शिवसेनेत ५० वर्ष राहिल्यानंतर मला उद्धव ठाकरेंची साथ सोडावी लागली. परंतु नियतीने माझ्यासमोर प्रश्न निर्माण केले होते. नियती कसा बदल घडवून आणते’, असे रवींद्र वायकर म्हणाले. आपल्यावर झालेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपाबाबत बोलताना वायकर म्हणाले, ‘माझ्याविरोधात झालेली तक्रार ही फौजदारी स्वरुपाची नव्हतीच. मला सर्वोच्च न्यायालयापर्यंत जावे लागले. माझे प्रकरण राजकीय होते, असे वकिलांनीही मला सांगितले. माझ्या मदतीसाठी कुणीही पुढे आले नाही. त्यामुळे माझ्यासमोर दुसरा पर्याय नव्हता.’

# पंकजा मुंडे यांच्याकडे कर्तुत्व-नेतृत्व असल्याने त्यांना निवडून द्या-नितीन गडकरी

बीड दि.१० (प्रतिनिधी)- पंकजा मुंडे यांच्यामध्ये कर्तुत्व आहे, नेतृत्व आहे, ती तुमच्यासाठी संघर्ष करू शकते. गरज पडल्यास स्वपक्षातही संघर्ष करणारी पंकजा मुंडे आहे. पंकजा मुंडे या खासदार झाल्यास महाराष्ट्राच्या विकासात मोठे योगदान देऊ शकतात. या जिल्ह्याच्या, या मतदारसंघाचा विकास करायचा असल्यास पंकजा मुंडे यांना निवडून द्या, असे आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी बीडमध्ये केले आहे. पंकजा मुंडे यांच्या प्रचारासाठी नितीन गडकरी यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी नितीन गडकरी यांनी गोपीनाथ मुंडे यांच्या आठवणींना उजाळा दिला.

नितीन गडकरी यांनी या सभेमध्ये गोपीनाथ मुंडे यांच्या आठवणीना उजाळा देत पंकजा मला माझ्या मुलीसारखी असल्याचे म्हटले आहे. विकसित भारत आणि विकास कामे, काँग्रेसचा कार्यकाळ, मोदींचा कार्यकाळ, जातीय राजकारण या सर्व विषयांवर या वेळी गडकरी यांनी भाष्य केले. पंकजा मुंडे ह्या केवळ गोपीनाथ मुंडे यांच्या कन्या आहेत, त्यामुळे निवडून देऊ नका. तर त्यांच्यामध्ये कर्तुत्व आणि नेतृत्व असल्याचे नितीन गडकरी यांनी म्हटले आहे. केवळ मुंडे साहेबांची मुलगी म्हणून पंकजा मोठ्या झाल्या नाहीत. तर त्यांच्यात काम करण्याची धमक असल्याचा दावा देखील नितीन गडकरी यांनी केला आहे.

# मोदींच्या वक्तव्यांनी देशाची मान शरमेने खाली; विजय वडेट्टीवार यांची टीका

नागपूर दि.१० (प्रतिनिधी)- पंतप्रधान नरेंद्र मोदी लोकसभा निवडणूक प्रचारात ज्या पद्धतीचे मुद्दे उपस्थित करीत आहे ते पंतप्रधान पदाला अशोभनीय असून त्यांच्या वक्तव्यांनी देशाची मान शरमेने खाली जात आहे, असे मत विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केले. ते आज नागपुरात माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते.

वडेट्टीवार म्हणाले, मोदींना पहिल्या टप्प्यातील मतदानानंतरच पराभव दिसायला लागला आणि त्यांनी दुसऱ्या टप्प्यातील भाषणात मंगळसूत्रचा विषय आणला. तेही चालेले नाही तर म्हैस आणली. दोन म्हशी असतील तर एक म्हैस काँग्रेस काढून येईल, असे भाषणातून सांगू लागले. देशाचे पंतप्रधान एखाद्या जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती सभापतींसारखे बोलत आहेत. यामुळे देशाची मान शरमेने खाली गेली आहे. आता पुन्हा त्यांची भाषा बदलली आहे. त्यांच्या भाषणात पाकिस्तान, मुसलमान, असे मुद्दे आले. तसेच राम मंदिरही आले. पण जनतेने या जुमलेबाज सरकारला सत्तेबाहेर करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे मोदींनी कोणताही नवीन जुमला आणला तरी जनतेचा त्याला प्रतिसाद मिळत नाही. मोदींचे भाषण सुरू झाले की लोक टीव्ही बंद करतात. अशी अवस्था मोदींची झाली आहे. भाषणाला लोकांच्या टाळ्या नाहीत, लोकांचा प्रतिसाद नाही म्हणून शेवटच्या टप्प्यात अदानी, अंबानी आणावे लागले. पण, काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी त्याला चोख उत्तर दिले आणि मोदींच्या मुद्यातील हवा काढली. मोदी, भाजपाने आता परतीचा मार्ग शोधून ठेवावा एवढीच एक औपचारिकता शिल्लक राहिली आहे, अशी टीकाही वडेट्टीवार यांनी केली.

(पान ४ वरुन)

### मोदींचे इंजिन थापा मारते; त्यांना...

वापर करून त्यांनी शिवसेना गद्दारांना दिली. माझा पक्ष हा माझ्यासमोर आहे. निवडणूक आयोगाच्या विरोधात आम्ही सर्वोच्च न्यायालयात गेलो आहोत. मोदी हे सर्वोच्च न्यायालयावरही दबाव आणण्याचं काम करत आहेत. सर्वोच्च न्यायालयाने काय निर्णय द्यावा, हे मोदी सांगत असल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांनी यावेळी केला.

ठाकरे पुढे म्हणाले की, मोदी म्हणतात की, हे मला संपवायला निघाले. हे एवढे केविलवाणे का झाले. माझा पक्ष फोडला, मला संपवण्याचा प्रयत्न केला. तरीदेखील तुम्ही इतके केविलवाणे का?, असा सवालही ठाकरेंनी केला. मोदी जी भाषा वापरत आहात, ती त्यांना शोभा देत नाही. महाराष्ट्र आणि मराठवाडा हा साधूसंतांचा आहे. संस्कृती जपणारा हा आमचा महाराष्ट्र आहे. आजपर्यंत तुम्ही सर्वकाही फोडण्याचा प्रयत्न केला. ठाकरे म्हणाले की, तुम्ही कायम कधी मला डोळा मारतात, कधी शरद पवारांना डोळा मारतात. हे आम्हाला नकली म्हणतात आणि त्यांच्याकडे येण्याची ऑफर देतात.

मोदीजी २०१४ साली पंतप्रधान व्हावे, म्हणून माझी सही घेतली आणि आता तुम्ही आम्हाला नकली शिवसेना आणि मला नकली संतान म्हणाले. तुम्ही तुमचा आत्मा संतानाला विकला का जसा अदानींना विकला तसा विकला का? असा सवालही ठाकरेंनी मोदींना केला.

मोदीनी त्यांच्या पाव उपमुख्यमंत्र्यांचे पाय रोवून माझ्यासोबत गद्दारी केली आहे. तुम्ही चांगलं चालू असलेलं महाविकास आघाडीचे सरकार पाडले आहे. बाळासाहेबांचा आशीर्वाद असता तर तुम्हाला मुंबईत गुडघे टेकवावे लागले नसते. तुम्हाला आमचा महाराष्ट्र रस्त्यावर उतरवल्याशिवाय सोडणार नाही. जसं मोदींनी नोटबंदी केली. तसेच आम्ही आता महाराष्ट्रात ४ जूननंतर महाराष्ट्राची नाणेबंदी करणार आहोत. मोदींचं नाणे हे ४ जूननंतर बंद होणार आहे असे त्यांनी म्हटले.

जरांगे पाटलांच्या आंदोलनावरही गोळीबार करण्यात आला. मी त्यावेळी रात्री भेटायला गेलो. त्यावेळी पोलिसही भयभीत झालेले होते. लाठ्याकाठ्या खाल्लेली लोक मी गेल्यानंतर त्यांनी जयघोष सुरू केला. त्यांना कोणीतरी आपल्या साथीला आल्याचा आनंद झाला. तुम्ही या मराठा बांधवांवर का अत्याचार केला आणि कुणाच्या ऑर्डरवर हा गोळीबार केला? तुम्ही फसवणूक करतात आणि नंतर आरक्षणाच्या गोष्टी करतात का? असा सवालही ठाकरेंनी यावेळी विचारला.

मोदींनी केजरीवालांचे सर्व अधिकार काढून घेतले. परंतु सर्वोच्च न्यायालयाने त्यांचे अधिकार त्यांना परत दिले. मात्र त्यांनी हा निर्णय लोकसभेत आणला आणि सर्व निर्णय केंद्राच्या ताब्यात आणले, हा दुटप्पीपणा सुरू असल्याचेही ठाकरेंनी यावेळी म्हटले.

उद्धव ठाकरे म्हणाले- आज अवकाळी पाऊस झाल्याने आज जालन्यात जाण्याचे रद्द केले. अशा वातावरणात हेलिकॉप्टर येऊ शकत नव्हते. त्यासाठी मी जालन्यातील नागरिकांची माफी मागतो. कारण मी दिलेला शब्द कधीही मागे घेत नाही, असे म्हणत उद्धव ठाकरे आज जालन्यातील सभेला उपस्थित राहू न शकल्याने त्यांनी नागरिकांची माफी मागितली. रावसाहेब दानवे यांची २५ वर्षे आणि मोदींची १० वर्षे आता खूप झाले आहेत. जालन्याचे कल्याण करण्यासाठी तिथे कल्याण काळेंना विजयी करा, असे आवाहनही ठाकरेंनी यावेळी केले.

पंतप्रधान मोदी येत असल्याने लातूरचे विमानतळ बंद करण्यात आले होते. तुम्ही फिरत असतांना एवढा कडेकोट बंद ठेवतात, हे योग्य नाही. समान नागरी कायदा नंतर आणण्याऐवजी आता तुम्हीही याचा अवलंब करायला हवा. मोदीजी पोलिस बाजूला ठेऊन जनतेत येऊन दाखवा, असे आव्हानही ठाकरेंनी यावेळी मोदींना केले आहे.

### अजित पवार-एकनाथ शिंदे...

देखील नाकारले होते. त्यामुळे हे आरक्षण त्यांच्या विचारांच्या विरोधात असल्याचा दावा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे. अशा पद्धतीने आरक्षण देणे म्हणजे संविधान निर्मात्यांच्या पाठीत खंजीर खुपसण्यासारखे आहे. हे पाप कधीही माफ होणार नाही, असा आरोप देखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे. वंचित, गरीब आणि आदिवासी लोकांचे आरक्षण काढून घेऊन ते त्यांच्या व्होटबँकेला देण्याचा डाव असल्याचा आरोप देखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे.

कर्नाटकमध्ये काँग्रेसने ओबीसी समाजाचे आरक्षण काढून घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या सरकारने एका रात्रीत कर्नाटकमध्ये मुस्लिम समाजाला ओबीसीचा दर्जा दिला. त्यामुळे ओबीसी समाजाच्या आरक्षणात वाटेकरी वाढले आहे. मात्र, जो पर्यंत मोदी जिवंत आहे, तो पर्यंत कोणाच्याही आरक्षणाला धक्का लागू देणार नसल्याचे मोदी यांनी म्हटले आहे. वंचितचा जो अधिकार, मोदी त्याचा चौकीदार असे म्हणत नरेंद्र मोदी यांनी आरक्षणाच्या मुद्यावर काँग्रेसला घेरण्याचा प्रयत्न केला.

### महिला कुस्तीपटूचे लैंगिक शोषण...

(दांडा मारणे) आणि कलम ३५४ अंतर्गत गुन्हा नोंदवला. कलम ५०६ (गुन्हेगारी धमकी) अंतर्गत आरोपपत्र दाखल करण्यात आले. ब्रिजभूषण शरण सिंह यांच्यावर सहा कुस्तीपटूंनी लैंगिक छळाचे आरोप केले होते. त्यांच्या तक्रारींच्या आधारे पोलिसांनी ब्रिजभूषण सिंह यांच्याविरोधात प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) नोंदवला होता. मात्र सहाव्या कुस्तीपटूकडून केलेल्या आरोपप्रकरणी आरोप निश्चित करण्यास न्यायालयाचा नकार दिला आहे.

### दोघांना जन्मठेप तिघे निर्दोष

म्हणजेच हत्येच्या ८ वर्षांनंतर आरोपींविरोधात खटला सुरू झाला. आता निकाल आला आहे. दिरंगाईमुळे राज्यभरात अंनिसतर्फे ठिकठिकाणी काळ्या फित लावून निषेध करण्यात आला. यासोबतच ठिकठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन ३ प्रमुख मागण्या करण्यात आल्या.

डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येनंतरच कॉ. गोविंद पानसरे, डॉ. कलबुर्गी, गौरी लंकेश या पुरोगामी विचारवंताचीदेखील हत्या करण्यात आली. या चारही हत्येतील आरोपींचा परस्परसंबंध असल्याची चर्चा सुरू आहे.

### पराभव होत असल्याची मोदींना...

दररोज नवे कार्ड वापरावे लागत आहे. लोकशाहीमध्ये जनता सर्वश्रेष्ठ असते नेता नाही, जनता आता नरेंद्र मोदींच्या फेकाफेकीला कंटाळली आहे त्यामुळे मोदी काहीही बोलले तरी आता त्याचा फारसा परिणाम होणार नाही. पराभवाची भिती स्पष्ट दिसत असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्रातच २९ जाहीर सभा घेत आहेत, मोदींच्या हातातून निवडणूक गेली आहे हे यातून स्पष्ट होत आहे. ज्यांच्यावर कालपर्यंत कठोर टीका केली त्यांनाच ऑफर देण्याची वेळ नरेंद्र मोदी यांच्यावर आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची शरद पवारांना ऑफर देणे म्हणजे ४ जूनला केंद्रात इंडिया आघाडीचे सरकार येणार या राहुल गांधी यांच्या विधानाला नरेंद्र मोदी यांचा दुजोराच आहे.

### राज्यात अनेक ठिकाणी अवकाळी...

यांच्या सभेला निघाले होते. ते निघून गेल्या नंतर गावातील जेष्ठ नागरिक दररोज दुपारी अंजनडोह गावातील वेशी जवळील वडाच्या झाडाखाली उन्हं टाळत गप्पा मारत बसतात. दुपारी तिन वाजेच्या सुमारास अचानक वातावरणात बदल होऊन वाऱ्यासह विजेचा कडकडाट सुरू होऊन पावसाला सुरुवात झाल्याने जमलेल्या पैकी काही जन जवळील शाळेत तर काही जनांनी जवळील सोसायटी च्या गोडाऊन मध्ये जाऊन थांबले. मात्र तातेराव आगाजी शिनगारे हे एकटेच वडाच्या खोडाच्या आडोशाला जाऊन उभे राहिले असता वडाच्या झाडावर विज पडल्याने ते गंभीर जखमी झाले. त्याना तात्काळ घाटी रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मयत घोषित केले. दुसरी घटना फुलंब्री तालुक्यातील आडगाव येथे घडली. अचानक आलेल्या अवकाळी पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्याने एका घरावरील पत्रे उडाली. तेंव्हा घरात असलेल्या एका व्यक्तीचा मृत्यू झाला.

९ ते १५ मे दरम्यान, महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात जोरदार पाऊस पडेल, असे हवामान विभागाकडून सांगण्यात आले आहे.